# अनामप्रेम स्नेहवार्ता




## अनामप्रेम
## मासिक वृत्तपत्रिका

## MAY - 2026

Scanned with OKEN Scanner





**अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात विहीर खोदकामाचा शुभारंभ**

अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात नव्या विहिरीच्या खोदकामाचा शुभारंभ पारंपरिक पद्धतीने विधिवत पूजन करून करण्यात आला. त्यानंतर पोकलेन मशीनच्या सहाय्याने विहीर खोदण्याच्या कामाला सुरुवात झाली.

या विहिरीमुळे प्रकल्पातील पाण्याची उपलब्धता वाढण्यास मोठी मदत होणार असून, विद्यार्थी, रहिवासी आणि प्रकल्पाच्या विविध उपक्रमांसाठी भविष्यात हा जलस्रोत अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.



**इंजिनिअरिंग इंटर्नशिप प्रोग्रॅम अंतर्गत आलेल्या विद्यार्थ्यांनी अनामप्रेम संस्थेच्या हिम्मतभवन वसतिगृहातील संगणक लॅबमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना संगणकाचे उत्कृष्ट प्रशिक्षण दिले.**

**प्रशिक्षणादरम्यान त्यांनी संगणकाचे मूलभूत ज्ञान, विविध उपयुक्त कौशल्ये आणि प्रत्यक्ष सराव अत्यंत संयमाने व आत्मीयतेने विद्यार्थ्यांना शिकवला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला आणि डिजिटल कौशल्ये विकसित करण्यासाठी त्यांना नवी प्रेरणा मिळाली.**





Scanned with OKEN Scanner

# हिम्मतभवन वसतिगृहात विविध उपक्रम उत्साहात संपन्न

## अपंगत्वावर मात करत अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी..!

अनामप्रेम संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाची गाथा लिहिली आहे. विविध प्रकारच्या अपंगत्वावर मात करून ३६ विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश मिळवत समाजासमोर प्रेरणेचा आदर्श निर्माण केला.

या यशामागे विद्यार्थ्यांचे अथक परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन, वाचक व रायटर यांचे मोलाचे योगदान तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे सातत्यपूर्ण सहकार्य लाभले.





अनामप्रेम हिम्मतभवन वस्तीगृहात सौ. भारती लाहुंडे मॅडम यांचा वाढदिवस तसेच मा. उज्वला कटारिया मॅडम व मा. वसंतलालजी कटारिया सर यांच्या लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त त्यांनी विद्यार्थ्यांप्रती आपुलकी व्यक्त करत आवश्यक साहित्य व खाऊचे वाटप केले.

तसेच पानसरे परिवाराने अनामप्रेम शहर प्रकल्पाला सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती जाणून घेतली. त्यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांसोबत आनंदाचे क्षण अनुभवले आणि भविष्यातही सहकार्याची भावना व्यक्त केली.





Scanned with OKEN Scanner

नवा मराठा
epaper.enavamaratha.com
06 May 2026 - Page 4



अपंगत्वावर मात करत यंदाच्या बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणारे अनामप्रेमचे विद्यार्थी.

## अपंगत्वावर मात करत अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांची यशोगाथा; जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाचा प्रेरणादायी विजय

नगर – अडथळे कितीही मोठे असले तरी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, याचे जिवंत उदाहरण अनामप्रेम संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा घालून दिले आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या या संस्थेतील विद्यार्थ्यांनी यंदाच्या बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत केवळ गुण मिळवले नाहीत, तर संपूर्ण समाजाला प्रेरणा देणारी यशोगाथा साकारली आहे.

अंध, अस्थिव्यंग आणि मूकबधिर अशा विविध गटांतील एकूण ३६ विद्यार्थ्यांनी आपल्या मर्यादांवर मात करत, कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले. त्यांच्या या यशामागे केवळ अभ्यास नव्हे, तर प्रत्येक क्षणी स्वतःशी लढण्याची ताकद आणि मी करू शकतो हा दृढ आत्मविश्वास दडलेला आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न, शिक्षकांचे निस्वार्थ मार्गदर्शन आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे सहकार्य मोलाचे ठरले. विशेषतः अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक म्हणून कार्य करणाऱ्या मिलन गंधे, गीता महाजन, आरती नेव्हे, ज्योती पुरी, ऋतिका पुरी आणि चेतन लांडगे यांचे योगदान उल्लेखनीय असून, त्यांच्या सेवेमुळे अनेक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख लाभले. तसेच रायटर म्हणून कार्य करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे योगदानही तितकेच प्रेरणादायी आहे.

संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रकाश शेठ, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. गिरीश कुलकर्णी, राधाताई कुलकर्णी, गोपीनाथ सरफरे, डॉ. मेघना मराठे, डॉ. रविंद्र सोमाणी, सीए अशोक पितळे, इंजी. अविनाश बोपर्डीकर, डॉ. सायली सतीश सोमण, नितीन थाडे आणि अनिल गावडे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.






## मर्यादांवर मात करत अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांची दहावीत यशस्वी भरारी.!

अनामप्रेम संस्थेच्या अंध, अस्थिव्यंग आणि मूकबधिर विद्यार्थ्यांनी दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचा प्रेरणादायी आदर्श समाजासमोर ठेवला आहे. प्रतिकूल परिस्थिती, शारीरिक मर्यादा आणि अनेक अडचणींवर मात करत विद्यार्थ्यांनी अथक परिश्रमाच्या बळावर हे यश मिळवले.


या उज्ज्वल यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक व रायटर म्हणून कार्य करणाऱ्या सहकाऱ्यांचे मोलाचे योगदान आणि अनामप्रेम परिवाराचे सातत्यपूर्ण सहकार्य आहे.

या निकालामुळे संपूर्ण अनामप्रेम परिवारात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थ्यांनी आपल्या यशातून "अपंगत्व ही मर्यादा नसून जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर कोणतेही स्वप्न साकार करता येते," हा प्रेरणादायी संदेश समाजाला दिला आहे.



Scanned with OKEN Scanner














## अनामप्रेम कौशल्य विकास केंद्रांतर्गत “मेलझर नवनिर्मिती केंद्र” लोकार्पण संपन्न..!

अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पातील कौशल्य विकास केंद्रांतर्गत मेलझर केमिकल प्रायव्हेट लिमिटेडच्या CSR सहकार्याने साकारलेल्या “मेलझर नवनिर्मिती केंद्र” चे लोकार्पण संपन्न झाले.

हे केंद्र केवळ स्क्रॅप यार्ड नसून दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास, सर्जनशीलता आणि स्वावलंबनाला नवी दिशा देणारे प्रेरणादायी व्यासपीठ आहे. येथे टाकाऊ वस्तूंमधून उपयुक्त व आकर्षक वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळणार आहे. यासोबतच "टाकाऊतून टिकाऊ" हा पर्यावरण संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेशही समाजापर्यंत पोहोचणार आहे.

कार्यक्रमात मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिद्द, कला आणि आत्मविश्वासाचे मनापासून अभिनंदन केले. भविष्यातही अशा उपक्रमांना सहकार्य करण्याची भावना व्यक्त करण्यात आली.



Scanned with OKEN Scanner

# सदिच्छा भेटीतून समाजहिताच्या कार्याला नवी प्रेरणा.




अनामप्रेम संस्था, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे ग्राम श्रमिक प्रतिष्ठा संस्थेचे वरिष्ठ मा. श्री. प्रशांतजी सुडे व पदाधिकाऱ्यांनी सदिच्छा भेट दिली.
यावेळी मान्यवरांचे स्वागत करून अनामप्रेम संस्थेच्या दिव्यांग बांधवांसाठी राबविण्यात येणाऱ्या शिक्षण, कौशल्य विकास, पुनर्वसन व स्वावलंबनाच्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. तसेच संस्थेच्या विविध प्रकल्पांची प्रत्यक्ष पाहणी करून विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा अनुभव त्यांनी घेतला.
अनामप्रेम संस्थेच्या सामाजिक कार्याचे आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या उपक्रमांचे त्यांनी मनापासून कौतुक केले. भविष्यातही संस्थेच्या कार्यात आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही देत लवकरच पुन्हा भेट देण्याची सदिच्छा व्यक्त केली.










Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम परिवारातील आनंदाचे क्षण..



अनामप्रेम संस्थेचा जिव्हाळ्याचा कार्यकर्ता राहुल खिरोडे आणि पूनम जाधव यांचा शुभविवाह सोहळा नाशिकच्या पावन भूमीत आनंदोत्साहात संपन्न झाला.

आई-वडिलांची उणीव असली तरी अनामप्रेम परिवार त्यांच्या पाठीशी कायम प्रेमाने आणि विश्वासाने उभा आहे. या मंगल प्रसंगी सर्वांच्या उपस्थितीने सोहळा अधिक संस्मरणीय ठरला.



अनामप्रेम संस्थेचा माजी विद्यार्थी व गौरंग शाळेचे विशेष शिक्षक श्री. राजू भगत आणि अनामप्रेमची कन्या कु. भाग्यश्री वराड यांचा शुभविवाह सोहळा संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पात सर्वांच्या शुभाशीर्वादाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.
अनामप्रेम परिवारासाठी हा केवळ विवाहसोहळा नव्हता, तर प्रेम, आपुलकी, विश्वास आणि कुटुंबवत्सल नात्यांचा सुंदर उत्सव होता. नवदांपत्याच्या आयुष्यात सुख, समृद्धी, प्रेम आणि यश सदैव नांदो, हीच अनामप्रेम परिवाराकडून मन:पूर्वक शुभेच्छा..!



Scanned with OKEN Scanner

# ग्रामीण भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची नवी आशा...











अनामप्रेम संस्थेच्या गौरंग अभिनव शाळेच्या टीमने अंध व अस्थिव्यंग गटातील पहिली ते पाचवी वयोगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव, पाथर्डी, श्रीरामपूर, संगमनेर, अकोले, नेवासा, जामखेड आदी तालुक्यांमध्ये व्यापक सर्वेक्षण राबविले.

या सर्वेक्षणातून ग्रामीण आणि दुर्गम भागातील १५ हून अधिक दिव्यांग विद्यार्थ्यांची शाळेसाठी निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या पालकांचे समुपदेशन करून शिक्षणाचे महत्त्व पटवून देत मुलांना शाळेत दाखल करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

या प्रयत्नांमुळे अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा नवा प्रवास सुरू होत असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्याची भक्कम पायाभरणी होत आहे. प्रत्येक दिव्यांग मुलापर्यंत शिक्षणाची संधी पोहोचवण्याचा अनामप्रेमचा हा संकल्प अधिक दृढ होत आहे.



Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम मराठवाडा वसतीगृहातील अपडेट.



चार्टर्ड अकाऊंटंट श्री. राजेंद्रजी झंवर यांनी अनामप्रेम संस्थेला एक लॅपटॉप भेट देऊन मोलाचे सहकार्य केले.
यापूर्वीही त्यांनी संगणक, अंध विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ संच तसेच अन्नदानाच्या माध्यमातून संस्थेला सातत्याने सहकार्य केले आहे.



उद्योगपती श्री. रवींद्र मालानी यांच्या समवेत प्रतिष्ठित व्यापारी श्री. ललित देवडा, उद्योगपती श्री. कैलाशजी कबाडे आणि श्री. गोपालजी पंडित यांनी संस्थेला सदिच्छा भेट देऊन विविध प्रकल्पांची सविस्तर माहिती जाणून घेतली.
चर्चा अत्यंत सकारात्मक झाली. सामाजिक कार्यासाठी सहकार्याची भावना व्यक्त करत त्यांनी आपल्या मित्रपरिवारात संस्थेची माहिती पोहोचविण्याचे आश्वासन दिले. तसेच श्री. ललित देवडा यांनी नॅपकिन बुके उपक्रमासाठी ऑर्डर मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.





अनामप्रेममध्ये कर्नल प्रशांत मनी त्रिपाठी सर यांचा वाढदिवस उत्साहात साजरा.
अनामप्रेम हिम्मतभवन वस्तीगृह, अहिल्यानगर येथे कर्नल प्रशांत मनी त्रिपाठी सर यांचा वाढदिवस आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.
यावेळी संस्थेच्या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. सरांच्या हस्ते संस्थेला आवश्यक किराणा साहित्य तसेच विद्यार्थ्यांना मॉर्निंग किटचे वाटप करण्यात आले.
प्रकाशगान संगीत मंचाच्या स्वागतगीताने आणि विद्यार्थ्यांच्या सुरेल सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगत अधिक खुलली. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.



Scanned with OKEN Scanner

# ज्योती संजय येवलेकर – जिद्दीची ज्योत





" अंधार असला तरी, ज्योती कधी विझत नाही,
जिद्दीच्या प्रकाशाने ती दिशा बदलत राहते."

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात एका साध्या घरात जन्मलेली कु. ज्योती संजय येवलेकर — नाव जसं सुंदर, तसं तिचं मनही उजळ आहे. १६ सप्टेंबर २००५ रोजी जन्मलेली ही कन्या जन्मतःच अपंग आहे, पण तिच्या मनातील प्रकाशाने तिला कधीही थांबू दिलं नाही. तिने कधीही हार मानली नाही.

वडील संजय येवलेकर हे भाजीपाल्याचा व्यवसाय करतात, तर आई नंदाबाई या मराठी शाळेमध्ये सफाई कामगार आहेत. घरात आई, वडील, एक भाऊ, एक बहीण — असे प्रेमाने भरलेले कुटुंब. या प्रेमळ वातावरणात ज्योती वाढली. या छोट्या जगात ज्योतीने आपला मार्ग स्वतःच्या प्रयत्नाने उजळवला.

"पायात अडथळे असले तरी मनात पंख असतील,
तर स्वप्नंही उडायला शिकवतात." ज्योतीने पहिली ते चौथीपर्यंतचे शिक्षण नगरपालिकेच्या शाळेत तर पाचवी ते दहावी पर्यंतचे शिक्षण पाटणी विद्यालय, श्रीरामपूर येथे पूर्ण केले. त्यानंतर अकरावी व बारावी पर्यंतचे शिक्षण खटोड महाविद्यालय, श्रीरामपूर येथे तिच्या चिकाटीमुळे आणि आई-वडिलांच्या पाठिंब्याने यशस्वीरित्या पूर्ण केले.

ज्योतीला लहानपणापासूनच हाताने सुंदर वस्तू बनवण्याची आवड होती.

डिसेंबर २०२४ मध्ये ती अनामप्रेम संस्थेत असलेल्या "Youth for Job" प्रशिक्षण केंद्रात दाखल झाली. येथे तिने एक महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले.
तिच्या शारीरिक अपंगत्वामुळे बाहेर नोकरी मिळणं कठीण होतं, पण अनामप्रेम संस्थेने तिच्या प्रतिभेला वाव दिला — आणि तिच्यासाठी नवीन क्षितिजं खुली झाली. यापूर्वी ती जुन्या साड्यांपासून  सुंदर पायपुसण्या, पर्स आणि शोभेच्या वस्तू तयार करत असे.

आज ज्योती अनामप्रेम संस्थेच्या कौशल्य विकास उपक्रमांतर्गत नॅपकिन बुके बनवण्याच्या विभागात कार्यरत आहे.
ती उत्तम प्रकारे नॅपकिन बुके बनवते, पायपुसणे विनते.

“फुलांचा सुगंध एक दिवस राहतो,
पण ज्योतीची जिद्द कायम दरवळत राहते.”

ज्योतीचे अनामप्रेम संस्थेविषयी मनोगत-

ज्योती सांगते —
"अनामप्रेम संस्थेमुळे आमच्यासारख्या दिव्यांगांना जगण्याची नवी दिशा मिळते. माझ्या कलेला इथे वाव मिळाला. घरी काहीच संधी नव्हती, पण इथे मला आत्मविश्वास मिळाला, आणि माझं आयुष्य बदललं.”

ज्योती नेहमी मन लावून आणि प्रामाणिकपणे काम करत असते. असे म्हटले जाते की "चांगल्या व्यक्तीचा सहवास हा उसासारखा असतो. कितीही घासा, तोडा, चुरगळा त्याचा गोडवा अखेरपर्यंत टिकवतो" याचप्रमाणे अनामप्रेम संस्थेमध्ये जो व्यक्ती शिक्षण घेतो, काम करतो त्याचे जीवन उजळून निघते.

ज्योतीची ही यशोगाथा म्हणजे —
जिद्दीचं प्रतीक, स्वप्नांचा सुगंध, आणि दिव्यांगांसाठी आशेचा दीप आहे.

“ज्योतीने दाखवला जगाला नवा उजेड,
जिथे जिद्द असते, तिथेच निर्माण होतो वेगळा वेध.”



Scanned with OKEN Scanner

संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

# अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करुन त्यांना रोजगारक्षम बनवा.



नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड



**संपर्क - अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर 9011918786/7350013805**



मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116

कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199

## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| | |
|---|---|
| Bank Name | State Bank Of India |
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ),<br>Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.



Scanned with OKEN Scanner